**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**महिला व बाल विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे -०१**
**सरळसेवा भरती जाहिरात क्रमांक ०१/२०२५**

जनहित याचिका क्रमांक १५२/२०११ बाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी महिला व बाल विकास विभागाकडील संरक्षण अधिकारी कनिष्ठ, गट-क या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत दि.६-११-२०२५ रोजी आदेश पारित केलेले आहे.

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचे दिनांक ६-११-२०२५ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूक आचार संहितेच्या काळात, संरक्षण अधिकारी कनिष्ठ या संवर्गातील रिक्त असलेली **१७** पदे सरळसेवा भरती प्रक्रियेव्दारे भरण्याबाबतच्या प्रस्तावास शासनाने पत्र क्र मबाआ-२०१२/प्र.क्र२५/का-७ दिनांक १४-११-२०२५ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार, आयुक्त, महिला व बाल विकास,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अधिनिस्त आस्थापनेवरील संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क (सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी एस-६: १९९००-६३२००) या संवर्गातील सरळसेवा कोटयातील रिक्त असलेली पदे **१७** भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडुन केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर सरळसेवा भरती प्रक्रियेशी संबधीत सविस्तर जाहिरात व ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची सुविधा https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर **दिनांक ८-१२-२०२५** पासुन उपलब्ध होणाऱ्या ऑन-लाईन लिंकवर उपलब्ध करुन दिली जाणार आहे.उमेदवारांनी संपुर्ण जाहिरात काळजीपुर्वक वाचुन केवळ ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज सादर करावेत. प्रस्तुत भरती प्रक्रियेकरीता केवळ उक्त संकेस्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज व ऑनलाईन पध्दतीने भरण्यात आलेले परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे सादर केलेले अर्ज /परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येणार नाही.

भरती प्रक्रियेसंदर्भातील सर्व कार्यक्रम वेळापत्रक,वेळापत्रकातील बदल इत्यादीबाबतच्या सूचना https://www.wcdcommpune.com या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.उमेदवारांशी भरती प्रक्रियेबाबत कोणताही स्वतंत्रपणे पत्रव्यवहार करण्यात येणार नसून सदर संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेवून त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी.

| | |
|---|---|
| **ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याचा सुरवात दिनांक** | **दिनांक ८-१२-२०२५ दुपारी १५.०० वाजे.पासून** |
| **ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक** | **दिनांक २२-१२-२०२५ रात्री २३.५५ वाजे. पर्यंत** |

उक्त भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, त्यामध्ये अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण किंवा संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे, भरती प्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल करणे, सामाजिक, समांतर/दिव्यांग/इतर आरक्षणामध्ये संवर्गनिहाय/पदनिहाय बदल करण्याचे,सरळ भरती प्रक्रियेच्या जााहिरातीमधील अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे/नव्याने अटी व शर्ती समाविष्ट करण्याचे/अटी व शर्ती रद्द करण्याचे सर्व अधिकार आयुक्त,महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी राखुन ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल. तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील.त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

**स्थळ - पुणे**
**दिनांक १८-११-२०२५**

**(नयना अर्जुन गुंडे)** भा.प्र.से
**आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**